Literacy for a Billion

Movie: He Daan Kunkvache
Year: 1983

Song: Om Shri Ganeshay Namoh
Lyricist: Kavi Sanjeev

ओम श्री गणेशाय नमः
गणेशाय नमः
ओम
आकार उकार मकार घेती
अक्षर रूपे ओमकाराची
अशी अक्षरे शिका
मुलानो अशी अक्षरे शिका
श्री गणेशा शिका मुलांनो
श्री गणेशा शिका
श्री गणेशा शिका मुलांनो
श्री गणेशा शिका
अक्षर आहे सरस्वतीची वंदनीय पादुका
अक्षर अक्षर शिका
श्री गणेशा शिका मुलांनो
श्री गणेशा शिका

अक्षर आहे मूळ जगाचे
अक्षर आहे मूळ जगाचे
अक्षर आहे कूळ आमचे
अक्षर आहे ऋषी मुनींचे
वेद पुराणे शास्त्र संहीता
अक्षर तू यात्रिका
अक्षर अक्षर शिका
श्री गणेशा शिका मुलांनो
श्री गणेशा शिका
अक्षरातूनी या शुन्याची
अक्षरातूनी या शुन्याची
रचना झाली ब्रम्हांडाची
युगे संपली पाषाणाची
प्रगती झाली विज्ञानाची
अशी श्रेय मालिका
अक्षर अक्षर शिका
श्री गणेशा शिका मुलांनो
श्री गणेशा शिका

माणूस नच मासाचा गोळा
हां…
माणूस नच मासाचा गोळा
ज्ञान तयाचा तिसरा डोळा
विज्ञानानी मिळो उजाळा
दिव्य घडावा विश्वसोहळा
जिंकूनी संहारका
अक्षर अक्षर शिका
श्री गणेशा शिका मुलांनो
श्री गणेशा शिका
अक्षर आहे सरस्वतीची वंदनीय पादुका
अक्षर अक्षर शिका
श्री गणेशा शिका मुलांनो
श्री गणेशा शिका
श्री गणेशा शिका मुलांनो
श्री गणेशा शिका

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*